IMPACT FACTOR SJIF 2021 = 7.380 ISSN 2319-4766

*AN INTERNATIONAL, PEER REVIEWED, REFEREED & QUARTERLY*

**SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES**

APRIL-JUNE, 2022, VOL-10, ISSUE-53

## मुंबई विद्यापीठ संलग्नित

रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीचे

## आर.पी गोगटे व विज्ञान आणि आर.व्ही.जोगळेकर वाणिज्य महाविद्यालय रत्नागिरी

आणि

## मराठी समाजशास्त्र परिषद

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## मराठी समाजशास्त्र परिषदेच्या ३१ व्या राष्ट्रीय अधिवेशन

# भारतीय समाज विकास प्रक्रिया

दिनांक 11 - 12 एप्रिल 2022

### मुख्य संपादक

डॉ. पी. पी. कुलकर्णी

प्राचार्य. गोगटे - जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी

### संपादक

प्रा. शिवाजी अशोक उकरंडे

सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग गोगटे-जोगळेकर महाविद्यालय,रत्नागिरी

### संयोजक

डॉ. दया पांडे

डॉ. संपद काळे

डॉ. राजकुमार भगत

डॉ.ज्योती पोटे

डॉ. श्री.निवास पिलगुलवार

# INDEX


| SR. NO. | TITLE & AUTHOR NAME | PAGE NO. |
|---|---|---|
| | **RC 06** | **281-342** |
| 59 | शेतकरी महिला : समस्या व उपाययोजना<br>*डॉ. बळीराम परशराम अवचार* | 281-285 |
| 60 | महाराष्ट्रातील शेतकरी चळवळी व कृषी व्यवस्था<br>*डॉ. एच. यु. पेटकर* | 286-289 |
| 61 | शेतकरी आत्महत्या एक सामाजिक समस्या<br>*प्रा. डॉ. अनिल खु. ठाकरे* | 290-293 |
| 62 | शेतकऱ्यांच्या समस्यांचे स्वरूप आणि कारणांचे समाजशास्त्रीय अध्ययन<br>*प्रा. डॉ. अमरीश एस. गावंडे* | 294-297 |
| 63 | स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील शेतकरी चळवळी<br>*प्रा. आनंद मनवर* | 298-299 |
| 64 | शेतकऱ्यांच्या समस्यांची कारणे आणि उपाय<br>*डॉ. संजय जे. भगत* | 300-302 |
| 65 | भारतीय कृषीव्यवसायाचे आधुनिकीकरण: एक अपूर्ण प्रकल्प<br>*डॉ. राजू लोटन भदाणे* | 303-307 |
| 66 | भारतातील आत्महत्याग्रस्त शेतकर्‍याच्या समस्यांचा एक चिकित्सक अभ्यास<br>*प्रो. डॉ. श्रीराम खाडे & प्रा. डॉ. संतोष गायकवाड* | 308-312 |
| 67 | आत्महत्याग्रस्त शेतकर्‍याच्या कौटुंबिक समस्या.............एक समाजशास्त्रीय अध्ययन<br>*प्रा. डॉ. सुजाता आर. नाईक (गवई)* | 313-318 |
| 68 | कोरोना-१९ कालावधीत शेती आणि शेतकऱ्यांवर झालेल्या परिणामांचा अभ्यास : विशेष संदर्भ बीड जिल्ह्यातील शिरूर तालुका<br>*डॉ. सुधीर आ. येवले* | 319-321 |
| 69 | जलयुक्त शिवार योजना ही काळाची गरज : पश्चिम विदर्भाच्या संदर्भात<br>*प्रा. डॉ. सुनिता धोपटे* | 322-327 |
| 70 | ग्रामिण समाजातील परिवर्तन<br>*प्रा. डॉ. मधुकर आत्माराम देसले* | 328-331 |
| 71 | शेतकरी आत्महत्येची कारणे व उपाययोजना एक समाजशास्त्रीय अध्ययन<br>*डॉ. संजय श्रीहरी कुंभारे* | 332-338 |
| 72 | अल्पभुधारणा आणि शेतकऱ्यांची सामाजिक स्थिती<br>*Mr. Prince M. Ganvir* | 339-342 |

# स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील शेतकरी चळवळी

**प्रा. आनंद मनवर**
*समाजशास्त्र विभाग, युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय अमरावती.*
*E-mail: anandmanwar.2013@gmail.com*

आपल्या देशातील सामाजिक चळवळीच्या अभ्यासात शेतकऱ्यांच्या चळवळीचा अभ्यास विशेष महत्त्वाचा ठरतो. भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे देशाच्या एकूण लोकसंख्येत 75% उपजिविका करणाऱ्या लोकांची संख्या इतर कोणत्याही व्यवसायातील लोकांच्या संख्येपेक्षा अधिक आहे. या लोकांच्या समस्या, त्यांची अंतर्गत रचना, सत्तेशी असणारे त्यांचे सबंध व आपल्या समस्यांशी तड लावण्यासाठी या समुहाने केलेल्या चळवळी अभ्यासणे महत्त्वाचे ठरते.

भारतीय समाजव्यवस्थेत अगदी ऐतिहासिक काळापासून सामाजिक चळवळी चालत आलेल्या आहे. परंतु भारतात ब्रिटीश राजवटीत सामाजिक चळवळींना जोर आल्याचे दिसते. 19 व्या शतकाच्या सुरवातीला युरोप मध्ये Social Movement हा शह फार मोठया प्रमाणात वापरण्यात आला. शोषित वर्गाच्या उध्दारासाठी तसेच नवीन समाजरचना अस्तित्वात आणण्यासाठी त्या अनुषंगाने ध्येय धोरणे आणि आर्थिक संबंधात परिवर्तन घडून आणण्याकरीता 'सामाजिक चळवळ' ही संज्ञा वापरली जाते.

**उदिष्ट :-** महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचा अभ्यास करणे.

**संज्ञाचा अर्थ**

१) शेतकरी :- शेतकरी ही विस्तृत संज्ञा असून त्यामध्ये कृषीयोग्य जमिनीवर शासकीय नियमानुसार मालकी असणाऱ्या सर्व व्यक्तींचा समावेश होतो. तसेच दुसऱ्याची शेतजमिन भाडे तत्त्वावर करण्याकरीता केली असेल तर त्याची शासकीय कार्यालयामध्ये नोंद असणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्याला शेतकरी म्हणता येणार नाही.

२) शेरीफ व शेरीफ यांच्या मते, सामाजिक चळवळ म्हणजे मानवी सबंधामध्ये निर्माण होणाऱ्या आंतरक्रियेची अशी व्यवस्था होय की जी निरंतर पुढे सुरु राहणारी प्रक्रिया दर्शविते.

महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचा इतिहास पाहायचा झाल्यास त्याची वैचारिक पार्श्वभूमी इ.स. 1883 साली महात्मा फुले यांच्या विचारात आढळते. त्याच्या शेतकऱ्यांच आसुळ या पुस्तिकेत शेतकऱ्यांची आर्थिक अवनती आणि सावकार, जमीनदार यांच्याकडून होणारे अमानुष शोषण यांचे चित्र आढळते. महात्मा फुले नंतर वासुदेव बळवंत फडके यांनी शेतकऱ्यांस बंड करण्यास प्रवृत्त केले. त्यानंतर पाऊनशे वर्ष शेतकऱ्यांच्या चळवळी आढळत नाही. त्यानंतर 13 जून 1949 रोजी केशवराव जेधे यांनी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली. त्यानंतर तेभागा हे बंगाल मधील आंदोलन तेलंगनातील उठाव (इ.स. 1946) यांनी वारली आदिवासींचे आंदोलन ही महत्वाची आंदोलने झाली.

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी फेब्रुवारी 1955 रोजी भारत कृषक समाजाची स्थापना करुन शेतकरी बांधवांना राष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ उपलब्ध करुन दिले. त्याचप्रमाणे शेतीच्या नवीन योजना कल्पना त्यांच्यापर्यंत पोहोचाव्यात म्हणून कृषी विद्यापीठांची स्थापना केली. शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा डोंगर कमी व्हावा म्हणून 1933 मध्ये कर्जमाफी अधिनियम मंजूर करण्यामध्ये खुप मोठे योगदान होते.

महाराष्ट्रात शरद जोशी यांच्या नेतृत्वात 1978-79 च्या मध्यात शेतकरी संघटना ही महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची संघटना स्थापन झाली. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळावा ही त्यांची प्रमुख मागणी होती. शेतकरी संघटनेने संघटीत शेतकरी द्वारा महाराष्ट्रात अनेक चळवळी घडून आणल्या. त्यामध्ये 1981 मध्ये नियाली येथे तंबाखु उत्पादक शेतकऱ्यांची आंदोलन तसेच 20 सप्टेंबर 1981 मध्ये कांदा व उस उत्पादकांचे आंदोलन घडविले. कारखानदाराप्रमाणे शेती उत्पादकता, भाव ठरविण्याचा अधिकार शेतकऱ्यांना असावा अशी मागणी होती. इ.स. 1882 मध्ये खानदेशात दुध भावासाठी आंदोलन चालविले.

कापुस आंदोलन 9 व 10 नोव्हेंबर 1986 आणि नोव्हेंबर, डिसेंबर या दोन टप्प्यातील आंदोलनात सुरवातीला कृत्रिम धाग्याच्या कापडावर बहिष्कार टाकण्यात आला. पुढे 23 नोव्हेंबर 1986 रोजी विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला या जिल्हयात आणि मराठवाडयातील परभणी, नांदेड या ठिकाणी रास्ता रोको आंदोलन केले.

शेतकरी कामगार पक्षाने 1950 साली दाभाडी येथे भरविण्यात आलेल्या अधिवेशनात नवीन सुधारणा शेतमजुरांना पुरेसे वेतन देणे, सावकारी नष्ट करणे, शेती व्यवसायाला कर्ज पुरवठयाची सोय करणे, त्यानंतर 1980 मध्ये शेकाप ने महाराष्ट्रात काही भागात खंडणी शेतकऱ्यांया शासकीय योजनाखाली सरकारच्या ताब्यातील योग्य मोबदला मिळावा यासाठी आंदोलने रायगड जिल्हयात केल्याचे दिसून यते.

भुमीसेना आंदोलन हे पालघर तालुक्यातील वारली आदिवासींनी शेतकऱ्यांनी आदिल नावाच्या आदिवासी नेत्याच्या नेतृत्वाखाली भूमीसेना संघटना स्थापन करुन त्यांनी सावकाराविरुध्द लढा उभारला.

**शेतकरी असंतोषाची कारणे**

१) कर्जबाजारीपणा
२) महागडे बी-बियाणे
३) उत्पादीत मालाला योग्य भाव न मिळणे
४) सिंचनाच्या साधनांचा अभाव
५) सरकारी योजनांचा सर्व शेतकऱ्यांना लाभ न मिळणे
६) शेतकऱ्यांचे दारिद्रय

**सारांश**

शेतकरी चळवळीचा इतिहास पाहता आपणास असे दिसून येईल की, शेतकरी चळवळीला चालना ही स्वातंत्र्यपूर्ण काळामध्ये मिळाली व ती हळूहळू संपूर्ण भारतभर पसरली. शेतकरी समाजावर होणारा अन्याय, जुलूमशाही, शेतमालाला रास्त् भाव या विचारातून अनेक शेतकरी चळवळ उभ्या झाल्या त्याचप्रमाणे महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्याचे काम महात्मा फुले पासून डॉ. पंजाबराव देशमुख आणि अनेक शेतकरी पक्ष संघटनांनी केलेले दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ सूची**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, *सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक चळवळी*

डॉ. ठाकरे अनिल, *आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास,* विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद

डॉ. देवगावकर एस.जी., डॉ. देवगावकर शैलेजा, डॉ. डुमरे जयमाला, *सामाजिक चळवळी परंपरागत आणि नविन,* साईनाथ प्रकाशन, नागपूर.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, *सामाजिक चळवळी : अस्पृश्यता निवारण, दलित, शेतकरी व कामगार*

*शहा घनश्याम, भारतातील सामाजिक चळवळी,* डायमंड पब्लिकेशन, पुणे.